# ताराबाई शिंदे यांचे स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथातील स्त्री-पुरुष तुलनाविषय विचार

शोधपत्र-समाजशास्त्र

* प्रा. कु. महानंदा राऊतखेडकर

ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातील स्त्री-पुरुष तुलनाविषयक विचार

ताराबाई शिंदे ह्यांचा काळ अदमासे १८४० ते १९१० असा मानला जातो. ताराबाई शिंदेचा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा जातीत जन्म झाला. शैक्षणिकदृष्ट्या हा समाज त्या काळी खूपच मागासलेला होता. ताराबाईंचे माहेरचे नाव शिंदेच होते. वडिलांचे नाव बापूजी हरी शिंदे होते व ते पुरोगामी विचारांचे असून म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे सभासद होते. ताराबाईंना मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान होते. ताराबाई शिंदेनी लिहिलेला 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ १८८२ मध्ये प्रसिद्ध झाला. या आपल्या ग्रंथात ताराबाईंनी स्त्री-पुरुषाची तुलना करून पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा, शोषणाचा विरोध केला आहे. समाजात निर्माण झालेल्या स्त्री-पुरुष विषमतेविरूद्ध अत्यंत क्रांतीकारक भाषेत परखडे विरोध नोंदविलेला आहे. म्हणूनच श्री मालशे म्हणतात, "एका मराठा बाईने, धार्मिक व पौराणिक स्वरूपाचे नव्हे तर सामाजिक ज्वलंत प्रश्नासंबंधी 'स्त्री-पुरुष तुलने' सारख्या प्रश्नावर .... १८८२ साली एक दीर्घ निबंध लिहावा ही खरोखरच नवलाईची गोष्ट म्हटली पाहिजे.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही शहराची, गावाची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामग्रीद्वारा प्रस्तुत संशोधन निबंधाचे अध्ययन करण्यात आले आहे.

**संशोधन आराखडा :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश :** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी पुढील उद्देश ठरविण्यात आलेले आहेत. १) ताराबाई शिंदे या पहिल्या स्त्रीवादी विचारक आहेत याचे अध्ययन करणे. २) ताराबाई शिंदे यांचे लिखाण सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे आहेत. ३) ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' विचारांचे अध्ययन करणे.

**व्याप्ती व मर्यादा :** ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथात तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय विचार व्यक्त होतात. परंतु, प्रस्तुत संशोधन निबंधात त्यांच्या स्त्री-पुरुष तुलना, स्त्रीवादी विचारावरच लक्ष केंद्रीत करून अध्ययन करण्यात आले आहे. हणजेच प्रस्तुत संशोधन निबंधासाठी विचारात घेतलेले अध्ययन क्षेत्र ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातील स्त्री-पुरुष तुलना, स्त्रीवादी विचारापुरतेच मर्यादित अशा स्वरूपाचे आहे. ताराबाई शिंदे प्रणित स्त्री-पुरुष तुलना खालीलप्रमाणे आहे.

**पुरुषी स्वैराचाराला विरोध :** पुरुषी स्वैराचाराला ताराबाई शिंदे विरोध करतांना म्हणतात, "जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्ये मोठे अलौकिक गुण कोणते? तुम्हीच कोण असे शूर म्हणून देवांनी तुम्हांला इतकी मोकळीक दिली? ... नि आता इंग्रज बहाद्दराचे राज्यात तर तुम्ही, तरवार बहाद्दर तर नाहीच व कलमबहाद्दर पण उरलेला नाहीत, सांप्रतच्या स्थितीत भाकरी बहाद्दर हे नाव तुम्हांस साजते"[१] म्हणजेच स्त्रियांवर अमानुष बंधने व पुरुषाला स्वैराचाराचे स्वातंत्र्य अशा समाजव्यवस्थेतील पक्षपाताला ताराबाई शिंदे विरोध करतात.

**कौटुंबिक जीवनातील पति-पत्नी नातेसंबंधात विषमता :-** "निसर्गतः स्त्री-पुरुष समान असूनही स्त्रीवर आज गुलामीचे जीवन लादले गेले आहे. स्त्री ही गृहलक्ष्मी राहिली नसून गृहबंदीशाळेतील बटीक बनलेली आहे" [२] तसेच पुढे त्या म्हणतात - " स्त्रिया निरंतर या संसारात नानाप्रकारे कष्ट, हाल, तहानभूक, जाच, हाणमार सोसून फक्त एक तुमच्या गोड शब्दाच्या भूकेल्या असतात. तुम्ही कमावून आणणार पणग त्याची पुढे सर्व व्यवस्था लावून, तुमचे मर्जीप्रमाणे वागून.... हाडाचे मणी व रक्ताचे पाणी होईपर्यंत कष्ट करून सदा तुमच्या मुखाकडे नजर असे असून त्यांच्या वाट्याला लाथाबुक्या, निंद्य विशेषणेच येतात"[३] या विधानांवरून ताराबाई शिंदे कौटुंबिक जीवनातील पति-पत्नी नातेसंबंधातील विषमता स्पष्ट करून दाखवितात.

**पुराणकथांना विरोध :** पुराणकथांना विरोध करतांना ताराबाई शिंदे म्हणतात, "विशाल बुद्धी देऊन परमेश्वराने तुम्हांला सर्व प्राणिमात्रात श्रेष्ठ केले. श्रेष्ठपदास शोभेल असे वर्तन तुम्ही करावे पण छे! ते कसे होईल? यात श्रेष्ठ तुमचे ब्रह्मदेव.... ते तरी कुठे साधू आहेत? ते तर तुमच्यापेक्षा सव्वाईच आहेत" "शंकरानी तपश्चर्या सोडून भिल्लीणीच्या मागे धाव घेतली. विश्वामित्रांनी तर कुत्र्याचा अवतार घेतला. तेंव्हापासून तुम्हांला कुत्र्याची उपमा देतात...."[४]

**विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार :** विधवांच्या पुनर्विवाहास ब्राह्मण जातीप्रमाणे इतरही काही उच्च जातीत विरोध होता. या संदर्भात

* समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड [ महाराष्ट्र ]

ताराबाई शिंदे म्हणतात, "पुर्नविवाहाच्या बंदीची चालन महान रोगाप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली" परंतु याच समाजात मात्र पुरुषांना विधुर पुरुषांना पुर्नविवाहाचे स्वातंत्र्य होते. [५]

**व्यभिचारातील विषम न्याय पद्धती :** "बालविधवांवर लादलेले सक्तीचे वैधव्य, केशवपन ह्याचे दुष्परिणाम प्रत्येकच सऱ्हदय माणसात दिसत असणार, तरूण वयात जर अशा एखादीचा पाय घसरला तर समाज तिलाच धारेवर धरतो. उजळमाथ्याने जगणे तिला अशक्य होऊन जाते. मग एखादी विहिर जवळ करणे, ते धैर्य न झाल्यास भ्रूणहत्येचे पातक शिरी घेणे, अन्यथा तीर्थक्षेत्री पळून जाऊन बाळ उकिरड्यावर टाकून, वाईट मार्गाने पोट जाळणे, हेच पर्याय त्या दुर्दैवी स्त्रीपुढे उरतात आणि ह्या सर्वाला जबाबदार असणारा पुरुष मात्र पुराव्याअभावी उजळमाथ्याने वावरू शकतो" तसेच त्या पुढे म्हणतात, "टाळी दोन्ही हाताने वाजते खरी, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो" अशा प्रसंगात स्त्रीच अडकून पडते. पण पुरुष मात्र पुराव्याअभावी सुटतो. [६]

**वैधव्य कल्पनेतली विषमता :** याबद्दल बोलतांना ताराबाई शिंदे म्हणतात, "नवऱ्या आधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायकोआधी मरावे याचा तुमच्या बापदादांनी देवापासून काही दाखला आणला काय रे? मरणे किंवा जगणे हे तर त्या सर्व शक्तिमान नारायणाचे हाती.... त्याला ह्या स्त्रियांनी काय करावे....? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे, स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षाही महाजबर अपराध्याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर अंधारकोठडीत रहावे, त्याप्रमाणे तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करून दाढ्यामिश्या भादरून यावत्जन्मापर्यंत कोठेही अरण्यवासात का राहु नये बरे? एक बायको मेली की तिचे दहावे दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी असा तुम्हांला कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे? .... नवऱ्यामागे अगदी सर्व सृष्टी व्यवहार सोडून हरि हरि ... करीत (बायकोने) बसावे तसे पुरुषाने का बसू नये?"[७] अशाप्रकारे ताराबाई शिंदेनी वैधव्य कल्पनेतील विषमता स्पष्ट करून त्याचा विरोध केलेला आहे.

**पति-पत्नी एकमेकांबद्दल समान अपेक्षा :** वैवाहिक नात्यात पति-पत्नींमध्ये समान अपेक्षा गृहित धरून ताराबाई शिंदे म्हणतात, "तुम्हांला जशी वाईट कुरूप, दुर्गुणी, गावंढळ बायको आवडत नाही. तसा बायकोला तरी या मासल्याचा नवरा आवडेल का? जशी तुम्हांला बायको चांगली पाहिजे तसा तिला चांगला नवरा नको का?

**पुरुषी अन्यायाचा विरोध :** समाज रचनेतील विषमता, पुरुष प्रधान संस्कृती पुरुषी वर्चस्वाची वृत्ती यांचा विरोध करतांना ताराबाई शिंदे म्हणतात, "स्त्रियांना निरंतर बंदिवानासारखे गृहतुरूंगात कैदी करून ठेवलेत व जिथे तिथे आपलीच चढती कमान करून राव, बनलेच.... त्यांना ना विद्या ना कुठे जाणे येणे"[८].....

**स्त्री-पुरुषांत असणाऱ्या समान नैसर्गिक भावना :** श्रीमंत वा राजे अतिशय दुर्वर्तन करणारे असून वर्ष-वर्ष, सहा-सहा महिने त्यांना घरची राणी किंवा बायको इ. चे दर्शनच नसते. ह्यामुळे बायकांना किंवा राण्यांना सुख म्हणून अगदी नसते. मग त्यांनी काय करावे? तेथे त्या सदा ऐश्वर्यात खाण्या-पिण्याचे तर पहाणे नकोच. मग त्यांनी त्या कुसूमचा पास कोणत्या रीतीने आवरून धरावे? आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना असे जेंव्हा होते तेंव्हा त्या मग डुकरीसारखे शेतखाण्यातून तोंडे खूपशितात, या दोषास कारणीभूत तुम्हीच. ताराबाई शिंदे या विधानावरून असे स्पष्ट करून सांगतात की, 'नैसर्गिक वासनांचे अस्तित्त्व स्त्री-पुरुष दोघांतही सारखेच असते. तसेच त्यांची पूर्ती न झाल्यास, त्या अनैसर्गिकपणे दाबल्यास अनीतिकारक वर्तन जसे पुरुषांकडून होते तसेच स्त्रियांकडूनदेखील होते.

सारांश, अशाप्रकारे ताराबाई शिंदेची स्त्री-पुरुष तुलना वस्तुनिष्ठ, मानवतेचा पुरस्कार करणारी, स्त्री-पुरुष विषमतेचा विरोध करणारी, विज्ञाननिष्ठ, बुद्धीप्रामाण्यवादी असलेली दिसून येते. भारतातील स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी चळवळीचा पाया मुख्य आधार ताराबाईंच्या या स्त्री-पुरुष तुलना ग्रंथातील विचारात दिसून येतो. त्यांच्या संपूर्ण ग्रंथाचा आशय काठोकाठ स्त्रीवादाने भरलेला आहे. तसेच, ताराबाई शिंदे ह्या भारतातील पहिल्या स्त्रीवादी लेखिका आहेत. एक स्त्री बाईपणाचे आयुष्य जगतांना, एक व्यक्ति समाजाचा घटक म्हणून तत्कालीन स्त्री-पुरुषांच्या आयुष्याचे सुक्ष्म निरीक्षण करून, पौराणिक व आधुनिक साहित्यांचा सखोल अभ्यास व चिंतन करून स्त्रियांवरील अन्यायाचा तीव्र विरोध करण्याचे कार्य ताराबाई शिंदेंनी आपल्या ग्रंथातून केले आहे. ताराबाई शिंदे सर्वच बाबतीत स्त्री-पुरुषांची तुलना करतात आणि स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणेच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय अधिकार असावेत याचे समर्थन करतात. यात त्या प्रामुख्याने पुरुषी स्वैराचाराला विरोध करतात. कौटुंबिक जीवनातील पति-पत्नी नातेसंबंधातील विषमतेचा विरोध करतात. पुराणकथांच्या आधारे स्त्री स्वातंत्र्यावर जी बंदी आणली जाते याचाही त्या विरोध करतात. तसेच, विधवा पुर्नविवाहाचाही पुरस्कार करतात.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक - मृणालिनी जोगळेकर, पृ. ९ २) कित्ता ३) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक - मृणालिनी जोगळेकर - पृष्ठ ९ ४) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक - मृणालीनी जोगळेकर - पृष्ट १० ५) ताराबाई शिंदे लिखित : स्त्री-पुरुष तुलना - विलास खोले, पृ.१ ६) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक, मृणालिनी जोगळेकर, पृष्ट १०-११ ७) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक - मृणालिनी जोगळेकर, पृष्ट १० ८) स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक, मृणालिनी जोगळेकर, पृष्ठ १५